# प्रकरण ८.
# राज्य विधीमंडळ / राज्याचे कायदेमंडळ

| कलम | तरतुदी |
|---|---|
| १६८ | राज्यांमधील विधानमंडळाची घटना |
| १६९ | राज्यांत विधानपरिषद निर्मित / बरखास्ती |
| १७० | विधानसभांची रचना |
| १७१ | विधान परिषदांची रचना |
| १७२ | राज्य विधिमंडळाचा कालावधी |
| १७३ | विधिमंडळाच्या सदस्यत्वाकरता अर्हता (पात्रता) |
| १७४ | विधिमंडळाची सत्रे, सत्र समाप्ती व विसर्जन |
| १७५ | राज्यपालाचा सभागृहांना संबोधून अभिभाषण करण्याचा व संदेश पाठविण्याचा अधिकार |
| १७६ | राज्यपालाचे विशेष अभिभाषण |
| १७७ | मंत्री व महाअधिवक्ता यांचे सभागृहांबाबत अधिकार |
| १७८ | विधानसभेचा अध्यक्ष व उपाध्यक्ष |
| १७९ | अध्यक्षपद व उपाध्यक्षपद रिक्त होणे, त्याचा राजीनामा देणे व त्यावरून दूर करणे |
| १८० | उपाध्यक्ष / अन्य व्यक्ती यांची अध्यक्ष म्हणुन कार्य करण्याचा अधिकार |
| १८१ | अध्यक्षास / उपाध्यक्षाने अविश्वास ठराव सादर झाल्यास अध्यक्षस्थान न स्वीकारणे |
| १८२ | विधान परिषदेचा सभापती व उपसभापती |
| १८३ | सभापती व उपसभासपतीपद रिक्त होणे/ राजीनामा देणे व त्यावरून दूर करणे. |
| १८४ | उपसभापती / अन्य व्यक्ती यांची सभापती म्हणून कार्य करण्याचा अधिकार |
| १८५ | सभापतीस / उपसभापतीने अविश्वास ठराव सादर झाल्यास अध्यक्षस्थान न स्वीकारणे |
| १८६ | अध्यक्ष व उपाध्यक्ष आणि सभापती व उपसभापती यांचे पगार व भत्ते |
| १८७ | राज्य विधिमंडळाचे सचिवालय |
| १८८ | सदस्यांनी शपथ घेणे किंवा दृढकथन करणे |
| १८९ | मतदान, जागा रिक्त असतानाही कार्य करण्याची सभागृहाची शक्ती व गणपूर्ती |
| १९० | सदस्यांच्या निरर्हता - जागा रिक्त करणे |
| १९१ | सदस्यत्वाबाबत निरर्हता |
| १९२ | सदस्यांच्या निरर्हतांबाबतचे निर्णय |
| १९३ | शपथ घेण्यापुर्वी / पात्रता नसताना स्थानापन्न होणे, मतदान करण्याबद्‌ल दंड |
| १९४ | विधिमंडळांची सभागृहे व सदस्य, समित्या यांचे विशेषाधिकार |
| १९५ | सदस्यांचे पगार व भत्ते |
| १९६ | विधेयके प्रस्तुत करणे व पारित करणे |
| १९७ | धन विधेयकाहून अन्य विधेयकांसंबंधी विधान परिषदेच्या अधिकारावर निर्बंध |
| १९८ | धन विधेयकांबाबत विशेष कार्यपद्धत |
| १९९ | धन विधेयकाची व्याख्या |
| २०० | राज्यपालाची विधेयकांस अनुमती |
| २०१ | विचारार्थ राखून ठेवलेली विधेयके वार्षिक वित्तीय विवरणपत्र |
| २०२ | वार्षिक वित्तीय विवरणपत्र |
| २०३ | अंदाजपत्रकाबाबत विधीमंडळाची पद्धती |
| २०४ | विनियोजन विधेयके |
| २०५ | पूरक, अतिरिक्त किंवा अधिक अनुदाने |
| २०६ | लेखानुदाने, प्रत्ययानुदाने व अनुदाने |
| २०७ | वित्तीय विधेयकांसंबंधी विशेष उपबंध |
| २०८ | सर्वसाधारण कार्यपद्धतीचे नियम |

| | |
|---|---|
| २०९ | वित्तीय कामकाजासंबंधी विधानमंडळाच्या कार्यपद्धतीचे विनियमन |
| २१० | विधानमंडळात वापरावयाची भाषा |
| २११ | विधानमंडळातील चर्चेवर निर्बंध |
| २१२ | न्यायालयांनी विधानमंडळाच्या कामकाजाबाबत चौकशी करावयाची नाही. |

## ➢ प्रस्तावना :

- राज्य शासनाच्या कायदेमंडळाला राज्य विधानमंडळ असे म्हणतात. राज्याच्या राजकीय व्यवस्थेत राज्य विधानमंडळाला प्रभावी व मध्यवर्ती भूमिका प्रदान करण्यात आलेली आहे. घटनेच्या भाग मधील कलम १६८ ते २१२ दरम्यान राज्य विधानमंडळाबाबतच्या तरतुदी आहेत. त्यांमध्ये राज्य विधानमंडळाचे संघटन, रचना, कालावधी, अधिकारी, कायदेकारी पद्धत, विशेषाधिकार, अधिकार इत्यादींबाबतच्या तरतुदी आहेत. यापैकी बऱ्याचशा तरतुदी संसदेप्रमाणेच आहेत, मात्र काही तरतुदींमध्ये वेगळेपणाही आहे.

## ➢ विधीमंडळाची रचना :

- भारतातील काही घटकराज्यांत विधीमंडळ हे द्विगृही आहे तर काही राज्यांत ते एकगृही आहे. ज्या राज्यांत विधिमंडळाचे एकच सभागृह आहे तिथे ते विधानसभा या नावाने ओळखले जाते. द्विगृही विधिमंडळ असलेल्या राज्यात वरिष्ठ किंवा द्वितीय सभागृहाला विधानपरिषद असे म्हणतात व कनिष्ठ किंवा प्रथम सभागृहाला विधानसभा असे म्हणतात.
- घटकराज्यासाठी विधानपरिषद निर्माण करण्याचा किंवा अस्तित्वात असलेली विधानपरिषद रद्द करण्याचा अधिकार घटनेने संसदेला दिलेला आहे. पण त्यासाठी संबंधित घटकराज्याच्या विधानसभेने एकूण सभासदांच्या बहुमताने आणि हजर राहून मतदान करणाऱ्या सभासदांच्या दोन–तृतीयांश बहुमताने तशी शिफारस संसदेला केली पाहिजे. या शिफारशीच्या आधारे संसद साध्या बहुमताने ठराव करून विधानपरिषद निर्माण करू शकते किंवा रद्द करु शकते. भारतात सध्या बिहार, जम्मू-काश्मिर, कर्नाटक, महाराष्ट्र, उत्तरप्रदेश व आंध्रप्रदेश या सहा राज्यांत विधानपरिषद आहे. इतर राज्यांत विधानसभा आहे.

राज्याचे विधीमंडळ
↓
राज्यपाल
↓

| विधानसभा | विधानपरिषद |
|---|---|
| (कनिष्ठ सभागृह) | (वरिष्ठ सभागृह) |
| अस्थायी सभागृह | स्थायी सभागृह |
| (लोकप्रतिनिधी) | (निर्वाचित व नियुक्त प्रतिनिधी) |

# विधानसभा

## ❖ तरतूद :

- राज्यघटनेच्या कलम १७० या कलमामध्ये विधानसभेच्या रचनेबाबत तरतूद आहे. भारताने दुहेरी शासन पद्धतीचा स्वीकार केलेला असून केंद्राच्या विधिमंडळाप्रमाणेच घटकराज्याचे विधिमंडळ असते. या घटकराज्याच्या विधीमंडळामध्ये विधान परिषद विधानसभा आणि राज्यपाल यांचा समावेश होतो. यापैकी विधानसभा हे कनिष्ठ सभागृह असून विधान परिषद हे वरिष्ठ सभागृह आहे. परंतु अधिकाराच्या बाबतीत विधानसभा हे विधान परिषदेपेक्षा श्रेष्ठ सभागृह म्हणून ओळखले जाते. कारण की, विधानसभेमध्ये जनतेने प्रत्यक्ष निवडून दिलेले सभासद असतात. भारतीय संविधानाच्या कलम १६९ ते १७० मध्ये घटक राज्य विधिमंडळाची तरतूद केली आहे.
- कलम ३३२ नुसार अनुसुचीत जाती व अनुसूचीत जमातींकरिता अनुक्रमे २९ व २५ जागांची नियुक्ती आहे.
- महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या वेळी विधानसभेच्या सभासदांची संख्या २६४ होती.

## ❖ पार्श्वभूमी :-

- महाराष्ट्र विधानसभेची सुरुवात ब्रिटिश काळामध्ये १८६१ च्या विधिमंडळ कायद्यानुसार मुंबई इलाख्यासाठी पहिल्यांदा विधानसभा १९२० मध्ये स्थापन झाली. (पुणे)
- या विधिमंडळात सुरुवातीला ८ ते १० सभासद होते.१९ जुलै १९३७ मध्ये मुंबई प्रांतासाठी विधानसभा स्थापन झाली.
- पहिले अधिवेशन पुणे येथे कौन्सिल हॉलमध्ये पार पडले.

## ❖ रचना :

- विधानसभा हे घटकराज्याच्या जनतेचे प्रतिनिधीत्व करणारे सभागृह आहे. विधानसभेचे सभासद घटकराज्याच्या जनतेकडून प्रत्यक्षरीत्या निवडले जातात.
- घटकराज्याच्या लोकसंख्येनुसार ही सभासद संख्या कमी - जास्त असते.
- विधानसभेचे सभासद प्रादेशिक प्रतिनिधीत्वाच्या पद्धतीने निवडले जातात. जेवढे सभासद निवडायचे असतील तेवढे राज्याचे प्रादेशिक मतदारसंघ निर्माण केले जातात व प्रत्येक मतदार संघातून एक प्रतिनिधी निवडला जातो. मतदारसंघाची आखणी करताना लोकसंख्या व भौगोलिक सलगता हे घटक विचारात घेतले जातात. साधारणपणे लोकसंख्येचे प्रमाण सर्व मतदारसंघात सारखे राहील हे पाहिले जाते.

१. विधानसभेत कमाल ५०० ते किमान ६० सदस्य असले पाहिजेत. अपवादात्मक परिस्थितीमध्ये (कमी लोकसंख्या व दुर्गम भाग) कमी सदस्य असले तरी चालतात.
उदा. सिक्किम – ३२ सदस्य
२. साधारणत: ७५,००० लोकसंख्येमागे एक सदस्य याप्रमाणे निवड केली जाते.
३. राज्याच्या लोकसंख्येच्या काही प्रमाणात जागा मागासवर्गीयांसाठी आरक्षित ठेवल्या जातात.
४. महाराष्ट्राच्या विधानसभेची सध्याची सदस्यसंख्या :- २८८
५. आसाम राज्य सोडून इतर सर्व राज्यांच्या विधानसभेमध्ये अनुसूचीत जमाती यांच्यासाठी काही जागा राखीव ठेवण्यात आले आहेत.

| | साधारण | अ. जा | अ. ज | एकूण |
|---|---|---|---|---|
| २००८ च्या पुनर्रचनेपूर्वी | २४८ | १८ | २२ | २८८ |
| २००८ च्या पुनर्रचनेनंतर | २३४ | २९ | २५ | २८८ |

| १३ वी विधानसभा २०१४ | पक्षीय बलाबल |
|---|---|
| बीजेपी मित्र पक्ष | १२२ + १ |
| शिवसेना | ६३ |
| काँग्रेस | ४२ |
| राष्ट्रवादी | ४१ |
| ए. आय. एम. आय. एम. | ०२ |

## ❖ पात्रता :

१. ती व्यक्ती भारताची नागरीक असावी.
२. त्या व्यक्तीने वयाची २५ वर्षे पूर्ण केलेली असावीत.
३. त्या व्यक्तीचे नाव संबंधीत घटकराज्याच्या कोणत्याही मतदार यादीत असणे आवश्यक आहे.
४. संसदेने वेळोवेळी कायदा करून विहित केलेल्या अटी त्याने पूर्ण केलेल्या असाव्यात.

## ❖ निवडणूक पद्धती : प्रत्यक्ष मतदान पद्धती

- प्रत्यक्ष मतदान पध्दती (सर्वसामान्य प्रौढ मतदार)

| १४ वी विधानसभा २०१९ | पक्षीय बलाबल |
|---|---|
| बीजेपी मित्र पक्ष | १०५ |
| शिवसेना | ५६ |
| काँग्रेस | ४४ |
| राष्ट्रवादी | ५४ |
| इतर | २९ |

## ❖ कार्यकाळ :

१. सभागृह : ५ वर्ष, सदस्य : ५ वर्ष
२. १९७६ च्या ४२ व्या घटनादुरुस्तीने - ६ वर्षे
३. १९७८ च्या ४४ व्या घटनादुरुस्तीने - ५ वर्षे
४. मुदतीपूर्वी राज्यपाल विधानसभा वरखास्त करू शकतात. (अविश्वासाचा ठराव व अल्पमत) संसद कायदा करून एक वर्ष कार्यकाल वाढवला जातो. आणीबाणीच्या काळात एक वर्ष कार्यकाल वाढवला जातो. मुदतीपूर्व विधानसभा बरखास्त (विसर्जित) झाल्यास ६ महिन्याच्या आत निवडणूका घ्याव्या लागतात.

## ❖ अपात्रता :

- एखादा सदस्य सभापतीच्या पूर्वपरवानगीशिवाय सलग ६० दिवस अनुपस्थितीत राहत असल्यास तो अपात्र ठरतो.
- राज्य विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे एकाच वेळी सदस्य राहता येत नाही. तसेच संसदेचे व विधानसभेचे एकाच वेळी सदस्य राहता येत नाही.
- लाभ देणाऱ्या सरकारी पदावरील व्यक्ती विधानसभेची सदस्य बनण्यास अपात्र ठरते. अशा व्यक्तीला विधानसभेची निवडणूक लढवायची असल्यास प्रथम तिने आपल्या पदाचा राजीनामा दिला पाहिजे. (संसदेने कायदा करून काही सरकारी पदे या नियमाला अपवाद ठरविलेली आहेत.)
- मानसिक विकलांग व्यक्ती अपात्र ठरते.
- नादार व्यक्ती अपात्र ठरते. दुसऱ्या देशाचे नागरिकत्व स्वीकारणारी व्यक्ती अपात्र ठरते.
- १९८५ साली घटनादुरुस्ती करण्यात आली आणि पक्षांतरावर बंदी घालणाऱ्या तरतुदी घटनेमध्ये समाविष्ट करण्यात आल्या. त्या तरतुदींचा भंग करणाऱ्या सदस्याचे विधानसभा सदस्यत्व रद्द होते.

### ❖ सदस्यांचे वेतन व भत्ते : विधानसभा वेतन ठरवते.

### ❖ अधिवेशन :

- कलम १७४, मुख्यमंत्र्याच्या सल्ल्याने राज्यपाल अधिवेशन बोलवतो. दोन अधिवेशनात ६ महिन्यापेक्षा जास्त कालावधी असता कामा नये. आवश्यकता वाटल्यास राज्यपालास जादा अधिवेशन बोलविण्याचा अधिकार आहे. अधिवेशन स्थगित किंवा बरखास्त करण्याचा अधिकारही राज्यपालास आहे.
- महाराष्ट्रात विधानसभेची तीन अधिवेशने होतात.
  i. पावसाळी
  ii. हिवाळी (हिवाळी अधिवेशन – नागपूर - उपराजधानी)
  iii. अर्थसंकल्पीय

### ❖ राज्यपालाचे अभिभाषण :

- कायदेमंडळाच्या दोन्ही सभागृहासमोर राज्यपाल भाषण करतो. या भाषणाने कामकाजाची सुरुवात होते.
- सार्वत्रिकनिवडणुकीनंतर दोन अधिवेशनात राज्यपाल हे अभिभाषण करतात. (निवडणुकीनंतर पहिले व अर्थसंकल्पीय)
- राज्यपालांना अभिभाषणासाठी राज्याचे महाधिवक्ता निमंत्रित करतात.

### ❖ विधानसभा (गणसंख्या) :

- अधिवेशनाच्या कामकाजासाठी आवश्यक असणारी संख्या म्हणजे गणसंख्या. ही गणसंख्या एकंदर सभासदाच्या १/१० किंवा दहाजण यांपैकी जी जास्त असेल ती समजली जाते. महाराष्ट्र विधानसभेची सभासद संख्या २८९ आहे. त्याच्या १/१० म्हणजे २९ ही संख्या १० पेक्षा मोठी असल्यामुळे २९ हीच गणसंख्या मानली जाते.
- गणसंख्या अपुरी असल्यास सभागृहाचे कामकाज गणपूर्ती होईपर्यंत तहकूब करणे अपरिहार्य ठरते.

### ❖ विधानसभेचे कायदेविषयक अधिकार :

- राज्यसूचीतील विषयावर विधानसभा कायदा करू शकते. विधानसभेने समवर्ती सूचीतील एखाद्या विषयावर कायदा केलेला असेल तर त्याच विषयवर संसद कायदा करू शकते.

### ❖ विधानसभेचे प्रशासकीय अधिकार :

- मंत्र्यांना निरनिराळे प्रश्न विचारले जातात. कामकाजावर बहिष्कारही टाकता येतो. निरनिराळ्या दुरुस्त्या सुचविण्याचे कार्य विधानसभा करते. विधानसभेने अविश्वासाचा ठराव १/२ बहुमताने संमत पारित केल्यास मंत्रिमंडळ राजीनामा देते.
- बहुतेक मंत्री व मुख्यमंत्री विधानपरिषदेमधील असले तरी ते शेवटी विधानसभेला जबाबदार असतात.

### ❖ विधानसभेचे आर्थिक अधिकार :

- विधानसभेच्या मान्यतेशिवाय सरकारला एक पैसाही खर्च करता येत नाही. सरकारी खर्चाच्या विविध साधनांचा शोध घेणे, ती निश्चित करून त्या मंजुरी देण्याचा अधिकार विधानसभेला आहे. अर्थसंकल्प मंजूर करताना विधानसभा मंत्रिमंडळाच्या कार्याची तपासणी करते. अंदाजपत्रकावरील चर्चा विधानसभा दोन वेळेस करते :
  i. सर्वसाधारण अंदाजपत्रकावर चर्चा करताना
  ii. निरनिराळ्या खात्याच्या अंदाजपत्रकावर चर्चा करताना
- विधानसभा अंदाजपत्रकातील तरतुदी कमी करू शकते. त्यात बदल करु शकते. विधानसभेने अर्थसंकल्प नामंजूर केल्यास मंत्रिमंडळाला राजीनामा द्यावा लागतो.

### ❖ विधानसभेचे निर्वाचन विषयक अधिकार :

१. विधानसभा सदस्य - राष्ट्रपती निवडणूक
२. राज्यसभेचे सदस्य निवडणूक
३. विधान परिषदेतील १/३ प्रतिनिधींची निवडणूक
४. विधानसभा सभापती व उपसभापती निवडणूक

### ❖ विधानसभेचे घटनादुरुस्तीविषयक अधिकार :

- संसदेला काही घटनादुरुस्त्या करताना विधानसभेची मान्यता घ्यावी लागते. उदा. राष्ट्रपतीची निवडणूक पद्धती, उच्च न्यायालयाची रचना व अधिकार क्षेत्र, संसदेतील राज्याचे प्रतिनिधीत्व, आणीबाणीची घोषणा किंवा राष्ट्रपती राजवट लागू करण्यासंबंधीचे ३६८ वे कलम यात बदल किंवा दुरुस्ती करताना देशांतील एकंदर घटकराज्यांच्या विधानसभांपैकी १/२ घटक राज्यांच्या विधानसभेची आवश्यकता असते. (सध्या १५ घटकराज्य)

# विधानसभेचे सभापती

## तरतूद : कलम १७८

- लोकसभेच्या सभापतीला जे अधिकार आहेत अशाच प्रकारचे अधिकार विधानसभा सभापतीला देखील आहेत.विधानसभेचे कामकाज चालवण्यासाठी निवडून आलेल्या सदस्यापैकी एकाची सभापती व दुसऱ्याची उपसभापती म्हणून निवड केली जाते.
- विधानसभेचे कामकाज चालू असेल तर तो सभापती असतो व जेव्हा विधानसभेचे प्रशासकीय कामकाज चालू असते. तेव्हा सभापतीस विधानसभेचा अध्यक्ष म्हणतात. साधारणत: सभापती हा सत्ताधारी पक्षाचा असतो तर उपसभापती विरोधी पक्षाचा असतो.

| विधानसभा अध्यक्ष (निवड प्रक्रिया) | कार्यकाल |
|---|---|
| • विधानसभेतील सर्व सदस्य एकत्र येऊन मतदानाद्वारे ही प्रक्रिया पार पाडतात. मतदानाची पद्धती कार्यरत अध्यक्ष ठरवतात.<br>• निवडणूक तारीख राज्यपाल ठरवितात. | • सभापतीचा ५ वर्षाचा कार्यकाल असतो. मात्र विधानसभा विसर्जित झाल्यानंतरही अध्यक्ष आपले पद रिक्त न करता, पद धारण करणे चालू ठेवतात. नवीन विधानसभेच्या पहिल्या बैठकीच्या तात्काळ आधी ते आपले पद रिक्त करतात. |

### ❖ सभापतींची कार्ये :

- विविध समित्यांची निवड व नियुक्ती
- सभेमध्ये कोणता विषय चर्चेला घ्यावा अथवा घेऊ नये हे ठरविणे.
- सभागृहातील कोणत्या सभासदाला भाषणासाठी किती वेळ द्यावा हे ठरविणे.
- एखाद्या प्रस्तावावर समान मते पडल्यास स्वत:चे निर्णायक मत देणे.
- एखाद्या व्यक्ती राज्य विधीमंडळाची सदस्य नसेल तर त्याला सभागृहात उपस्थितीची परवानगी द्यावी / देऊ नये हे ठरविणे व दंड आकारणे. एखादे विधेयक धन विधेयक आहे किंवा नाही ते ठरविणे.
- एखाद्या सभासदाला प्रशासकीय भाषेत बोलता येत नसेल तर त्याला त्याच्या मातृभाषेतून बोलण्याची परवानगी देणे.
- अध्यक्ष स्थान भूषवणे. कामकाजावर नियंत्रण ठेवणे. सभागृहात शांतता व सुव्यवस्था करणे.
- सभासदाला भाषण करण्याची परवानगी देणे. प्रश्न व पुरवणी प्रश्न विचारण्याची परवानगी देणे.
- विधानसभा सभापतीला निर्णायक मत देण्याचा अधिकार. अर्थ विधेयक मांडण्यास परवानगी देणे.

### ❖ राजीनामा : सभापती राजीनामा उपसभापतीकडे देतो.

### ❖ बडतर्फी :

- एकूण सदस्यांपैकी १/३ सदस्यांनी जर अकार्यक्षमता व गैरव्यव्हार या कारणामुळे सभापती व उपसभापती यांच्यावर अविश्वासाचा ठराव मांडला तर...

१. त्याला १४ दिवसांची आगाऊ नोटीस द्यावी लागते.
२. २/३ बहुमताने ठराव मंजुर झाल्यास सभापती व उपसभापतीला बडतर्फ करतात.
३. सभापतीला आणि उपसभापतीला बडतर्फ केले की त्याचे सभागृहाचे सदस्यत्व कायम राहते.
४. सध्या महाराष्ट्राच्या विधानसभेचे सभापती हरीभाऊ बागडे आहेत. ते १३ व्या विधानसभेचे सभापती आहेत. पक्ष : भारतीय जनता पक्ष (भाजप)

# उपसभापती

### ❖ उपसभापती (निवडणूक) :

- कलम १७८ अन्वये, अध्यक्षांप्रमाणेच विधानसभेचे सदस्य आपल्यातील एका सदस्याची निवडणूक उपाध्यक्ष म्हणून करतात. त्यांची निवडणूक अध्यक्षांच्या निवडणुकीनंतर होते. निवडणुकीची तारीख अध्यक्षांमार्फत ठरविली जाते.

### ❖ उपसभापती (कार्यकाल) :

- अध्यक्षांप्रमाणेच उपाध्यक्ष सुद्धा विधानसभेच्या कालावधी दरम्यान आपले पद धारण करतात. मात्र पुढील तीन परिस्थितींमध्ये पदावधी संपण्याच्या आतच त्यांचे पद रिक्त होते. जर त्यांचे विधानसभेचे सदस्यत्व संपुष्टात आले तर
- जर त्यांनी आपल्या पदाचा अध्यक्षांना संबोधून सहीनिशी लेखी राजीनामा दिला तर

- जर त्यांना पदावरुन दूर करण्याचा उद्देश असलेला ठराव किमान १४ दिवसांची पूर्व नोटीस दिल्याशिवाय मांडता येत नाही. हा ठराव विधानसभेच्या तत्कालीन सदस्यसंख्येच्या बहुमताने (म्हणजेच प्रभावी बहुमताने) पारित होणे गरजेचे असते. सभापतीने राजीनामा दिल्यास व गैरहजर असल्यास उपसभापती कामकाज पाहतो. जर उपसभापती नसल्यास राज्यपालाने नेमलेला विधानसभेचा ज्येष्ठ सभासद सभापती असतो.

### ❖ उपसभापती (कार्य व अधिकार) :

- उपाध्यक्षांना सामान्यत: उपाध्यक्ष म्हणून कोणतेही कार्य नसते. विधानसभेचे अध्यक्ष सभागृहाचे अध्यक्षस्थान भुषवित असताना उपाध्यक्ष हे इतर सदस्यांप्रमाणेच असतात. अशा वेळी त्यांना विधानसभेत बोलण्याचा, कामकाजात भाग घेण्याचा व मतदानाचा अधिकार असतो.

## राज्य विधीमंडळ कामकाज

### १. प्रश्न - उत्तराचा तास :

- विधिमंडळाच्या बैठकीची सुरुवात या तासाने होते. त्याचे तीन प्रकार आहेत :-

a) तारांकित प्रश्न - ज्या प्रश्नाला सभागृहात ताबडतोब तोंडी उत्तर द्यावे लागते.

b) सूचना प्रश्न – हा प्रश्न विचारण्या अगोदर सात दिवस पूर्व सूचना द्यावी लागते व त्यानंतर सभागृहात उत्तर मिळते.

c) लेखी प्रश्न (तारांकित प्रश्न) : केवळ लेखी उत्तर हवे असल्यास सात दिवस अगोदर सुचना देऊन सभागृहात लेखी उत्तर मागविले जाते.

### २. विशेष अधिकार व हक्क भंग :

- सभागृहाची बैठक सुरु होण्यापूर्वी एक तास अगोदर सदस्याला हक्क भंग सुचना मांडता येते.

❑ **स्थगन प्रस्ताव :**

- विशिष्ट महत्त्वाच्या विषयावरील कामकाज करण्यासाठी विधानसभेतील चालू काम बाजूला ठेवून मांडलेला प्रस्ताव म्हणजे स्थगन प्रस्ताव होय. एका बैठकीत एकच स्थगन प्रस्ताव मांडता येतो.
- स्थगन प्रस्तावावर फक्त दोन तास चर्चा करता येते.

❑ **लक्षवेधी सूचना :** (घटनेत उल्लेख नाही संसद कामकाजात उल्लेख १९५४ पासून लागू.)

- तातडीच्या व सार्वजनिक बाबींकडे लक्ष वेधण्यासाठी लक्षवेधी सूचना मांडल्या जातात.
- एका बैठकीत अशा २ सूचना मांडता येतात.

❑ **अंतिम आठवडा :** सार्वजनिक व महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करण्यासाठी अध्यक्ष व सभागृहातील जेष्ठ नेते व सदस्यांचा विचार घेऊन अंतिम आठवड्याच्या दिवशी कामकाज ठेवले जाते. (शुक्रवार)

❑ **अविश्वासाचा ठराव :** अविश्वास दाखवण्याचा अथवा मंत्रिमंडळाविषयी नापसंती व्यक्त करण्याचा जो प्रस्ताव मांडतात, त्याला 'अविश्वासाचा प्रस्ताव' म्हणतात. त्यासाठी १४ दिवसांची आगाऊ नोटीस (पूर्वसूचना) मुख्यमंत्री व मंत्रिमंडळाला द्यावी लागते.

❑ **अल्पकालीन चर्चा :** निकडीच्या महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करण्यासाठी सदस्य अल्पकालीन चर्चेची सूचना देतात. यावर कमाल अडीच तास चर्चा होते.

❑ **अनियमित दिन प्रस्ताव :** एखाद्या सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा घडवून आणण्यासाठी ही सूचना देतात. या प्रस्ताव चर्चेसाठी कोणताही दिवस निर्धारित केलेला नसल्यामुळे मान्य झालेला प्रस्ताव अनियतदीन प्रस्ताव म्हणून ओळखले जातात.

❑ **विधानसभेच्या समित्या :** राज्यकारभारावर नियंत्रण ठेवणाऱ्या समित्यांपैकी अंदाज समिती, लोकलेखा समिती व उपविधान समिती या महत्त्वाच्या आहेत. या समित्या, विधिमंडळाचे दोन चक्षू व एक लगाम आहे. अंदाज समिती व लोकलेखा समिती या सरकारच्या आर्थिक स्वरुपाच्या बाबीवर देखरेख ठेवण्याच्या दृष्टीने उपयुक्त कामगिरी बजावितात.

### ❖ राज्यविधीमंडळाच्या अधिकारांवरील मर्यादा :-

१. **राष्ट्रपतीची पूर्वपरवानगी :** काही विधेयके विधिमंडळात मांडण्यापूर्वी त्यांना राष्ट्रपतींची पूर्वपरवानगी द्यावी लागते. उदा. व्यापार, व्यवसाय यांच्या स्वातंत्र्यावर निर्बंध घालणे किंवा इतर राज्यांसोबतची आंतरक्रिया बंद करणे इ. विधेयकांना राष्ट्रपतीची पूर्वपरवानगी आवश्यक असते.

२. **राज्यपालाने विधेयक राखून ठेवणे :** विधिमंडळाने मंजूर केलेली काही विधेयके राष्ट्रपतींच्या मंजुरीसाठी राज्यपाल राखून ठेवू शकतो. अशा विधेयकांना राष्ट्रपतींनी मान्यता दिल्यानंतरच त्याचे कायद्यात रुपांतर होते.अशा विधेयकांमध्ये वीज आणि पाणी मालमत्ता ताब्यात घेणे, विक्रीकर कर लावणे किंवा सर्वसामान्यासाठी अत्यावश्यक वस्तू म्हणून संसदेने घोषित केलेल्या वस्तुंची खरेदी करणे किंवा संसदेने मान्य केलेल्या कायद्याशी विसंगत असलेले समवर्ती सूचीतील एखाद्या विषयाबाबतचे विधेयक इ. बाबी राज्यपाल राष्ट्रपतींच्या मान्यतेसाठी राखून ठेवी शकतो.

३. **राष्ट्रीय आणीबाणीतील मर्यादा :** कलम ३५२ नुसार राष्ट्रीय आणीबाणी लागू असताना संसद राज्यसूचीतील कोणत्याही विषयाबाबत कायदा करू शकते. असा कायदा आणीबाणीच्या काळात कार्यरत तर असतोच पण आणीबाणी संपुष्टात आल्यापासून सहा महिन्यांपर्यंत (कल २५०) देखील अस्तित्वात असतो.

४. **घटनात्मक आणीबाणी :** कलम ३५६ नुसार घटक राज्यात घटनात्मक आणीबाणी असेल तर संबंधित राज्याबाबत संसद कायदे करते.

५. **राज्यपालाचा विवेकाधिकार :** राज्यपालाने विवेकाधिकाराच्या अधीन राहून केलेली कोणतीही कृती विधिमंडळाच्या अधिकाराक्षेत्रात येत नाही. आपल्या विवेकाधिकाराचा वापर करत राज्यपाल विधानसभा देखील बरखास्त करू शकतो. आसामच्या राज्यपालांना काही भागाचे प्रशासन चालविण्यासंदर्भात विवेकाधिकार आहे.

६. **समवर्ती सूचीबाबत कायद्यांचे श्रेष्ठतत्व :** समवर्तीसूचीतील कोणत्याही विषयावर केंद्र व राज्यसरकारे कायदा करू शकतात. परंतु एखाद्या विषयावर दोघांनीही कायदे केले असतील आणि त्या कायद्यांमध्ये सुसंगतपणा आढळत नसेल तर राज्यविधिमंडळाच्या कायद्याऐवजी केंद्राचा कायदा ग्राह्य मानला जातो.

७. ३६५ नुसार राज्याच्या केंद्राचे निर्णय मान्य न केल्यास राज्यसरकार बरखास्त केले जाते.

# विधान परिषद

## ❖ तरतूद :

- राज्यात विधानपरिषद असावी अशी तरतूद कलम १७१ मध्ये आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम १६८ नुसार घटक राज्यामध्ये द्विगृही कायदेमंडळाची तरतूद करण्यात आलेली आहे. घटक राज्याच्या विधिमंडळातील वरिष्ठ सभागृहाला विधान परिषद म्हणून ओळखले जाते. भारताच्या थोड्या घटक राज्यात द्विगृही कायदेमंडळ दिसून येते. त्यापैकी सध्या भारतात उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, कर्नाटक, बिहार, जम्मू काश्मीर, तेलंगणा आणि आंध्रप्रदेश या सात घटकराज्यांमध्ये विधान परिषदेत अर्थात द्विगृही विधिमंडळ दिसून येते. आपल्या घटक राज्यामध्ये विधान सभा असावी किंवा नसावी यांचा अधिकारी घटना कलम १६९ नुसार विधान सभा व संसदेला देण्यात आलेला आहे.

## ❖ पार्श्वभूमी :

- वरिष्ठ सभागृह
- महाराष्ट्रात विधानपरिषदेची स्थापना २० जुलै १९३७ साली पुणे येथे झाली. काऊन्सिल हॉल, पुणे या ठिकाणी पहिली बैठक.
- महाराष्ट्राची विधानपरिषद १९८० मध्ये निलंबित होती. देशात सध्या ७ विधानपरिषदा आहेत.
- महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, कर्नाटक, जम्मू व काश्मीर, बिहार, आंध्रप्रदेश, तेलंगणा, सन २०१० मध्ये तामिळनाडू विधानसभेने वेगळ्या विधानपरिषदेचे विधेयक मंजूर करून संसदेकडे पाठवले होते. परंतु यु.पी. ए. सरकारने ते २०१३ मध्ये रद्द केले. विधानपरिषदेला निरनिराळ्या घटकांचे प्रतिनिधीत्व करणारे मंडळ म्हणून ओळखले जाते.

| निर्मितीप्रक्रिया | बरखास्ती | रचना | पात्रता |
|---|---|---|---|
| • कलम १६९ (१) नुसार संबंधित घटकराज्याच्या विधानसभेने २/३ बहुमताने ठराव मंजूर केल्यास असा ठराव राज्यपालाकडून राष्ट्रपतीकडे पाठवला जातो व तो ठराव राष्ट्रपती संसदेसमोर ठेवतात व संसदेने सध्या बहुमताने मंजुरी दिल्यास संबंधित राज्यात विधानपरिषद निर्माण होते. | • कलम १६९ (१) नुसार विधानसभेने सभासदांच्या व उपस्थित राहून मतदान करणाऱ्या सभासदांच्या २/३ बहुमताने ठराव संमत केल्यास संसद अशा राज्यात नसलेली विधान परिषद निर्माण करू शकते किंवा अस्तित्वात असलेली विधान परिषद बरखास्त करू शकते व विधानसभा याबाबत असा ठराव मंजूर करून संसदेला विनंती करते. परंतु याबाबत संसद असा ठराव स्वीकारू शकते वा नाकारते. | • विधानपरिषदेत किमान सदस्य – ४०,<br>• कमाल–विधानसभेच्या १/३ सदस्यसंख्येपेक्षा जास्त नसावे.<br>• उदा.महाराष्ट्र विधानसभेची सदस्यसंख्या – २८८,<br>• विधानपरिषद सदस्यसंख्या - ७८ | १. ती व्यक्ती भारताचा नागरिक असावी.<br>२. त्या व्यक्तीने वयाची ३० वर्षे पूर्ण केलेली असावी.<br>३. त्या व्यक्तीचे नाव संबंधित घटक राज्याच्या कोणत्याही मतदार यादीत असणे आवश्यक आहे.<br>४. संसदेने वेळोवेळी कायदा करून विहित केलेल्या अटी त्या व्यक्तीने पूर्ण केलेल्या असाव्यात. |

### ❖ सदस्यांची निवड :

महाराष्ट्र विधानपरिषद

- नियुक्ती १/६ राज्यपालांकडून (१२)
- निर्वाचित
  - १/१२ सभासद पदवीधर मतदार संघातून (७)
  - १/१२ शिक्षक मतदार संघातून (७)
  - १/३ विधानसभेच्या सभासदांकडून (२६) सध्या (३०)
  - १/३ स्थानिक स्वराज्य संस्थांकडून (२६) सध्या (२२)

### ❖ कार्यकाल :

१. सभागृह : विधानपरिषद हे स्थायी सभागृह आहे. ते कधीच बरखास्त होत नाही.
२. सदस्य : दर दोन वर्षांनी १/३ सदस्य निवृत्त होतात व तेवढेच सदस्य पुन्हा नियुक्त केले जातात.
३. सदस्यांचा कार्यकाल ६ वर्षे.

**❖ राजीनामा :** सदस्य आपला राजीनामा विधानपरिषदच्या सभापतीकडे देतात.

### ❖ विधानपरिषद (अपात्रता) :-

- लाभ देणाऱ्या शासकीय पदावर असल्यास
- सभागृहाच्या परवानगीशिवाय सतत ६० दिवस विधानपरिषदेच्या बैठकींना गैरहजर राहिल्यास
- मानसिकदृष्ट्या विकलांग किंवा नादार असल्यास
- निवडणुकीतील भ्रष्टाचाराबद्दल न्यायालयाने किंवा निवडणूक न्यायाधिकरणाने दोषी ठरविल्यास
- निवडणूक खर्चाचे हिशेब योग्य वेळी आणि योग्य पद्धतीने सादर केले नसल्यास
- सरकारी नोकरीतून भ्रष्टाचार किंवा निष्ठाभंग या कारणावरून बडतर्फ केले असल्यास
- शासकीय महामंडळामध्ये उच्च पदावर असल्यास किंवा शासकीय करारात हितसंबंध गुंतलेले असल्यास
- पक्षांतर बंदी कायद्याचा भंग केल्यास.

### ❖ अधिवेशने :

- २ अधिवेशनामध्ये ६ महिन्यापेक्षा जास्त अंतर असता कामा नये.वर्षाला ३ अधिवेशन - पावसाळी, हिवाळी आणि अर्थसंकल्पीय.

**❖ गणसंख्या :** किमान १० किंवा १/१० यापैकी जी मोठी असेल ती.

## सभापती

**❖ सभापती व उपसभापती** - विधानपरिषदेतील एकूण सदस्यातून एकाची सभापती अशी निवड केली जाते.
**❖ कार्यकाल** - ६ वर्षे
**❖ कार्ये** - विधानसभेच्या सभापतीप्रमाणे.
**❖ राजीनामा** - सभापती आपला राजीनामा विधानपरिषदच्या उपसभापतीकडे देता

### ❖ सभापतींची कार्ये :-

- विविध समित्यांची निवड व नियुक्ती
- सभेमध्ये कोणता विषय चर्चेला घ्यावा अथवा घेऊ नये हे ठरविणे.
- सभागृहातील कोणत्या सभासदाला भाषणासाठी किती वेळ द्यावा हे ठरविणे.

- एखाद्या प्रस्तावावर समान मते पडल्यास स्वत:चे निर्णायक मत देणे.एखाद्या व्यक्ती राज्य विधीमंडळाची सदस्य नसेल तर त्याला सभागृहात उपस्थितीची परवानगी द्यावी / देऊ नये हे ठरविणे व दंड आकारणे.
- एखाद्या सभासदाला प्रशासकीय भाषेत बोलता येत नसेल तर त्याला त्याच्या मातृभाषेतून बोलण्याची परवानगी देणे.
- अध्यक्ष स्थान भूषवणे. कामकाजावर नियंत्रण ठेवणेसभागृहात शांतता व सुव्यवस्था करणे.
- सभासदाला भाषण करण्याची परवानगी देणे.प्रश्न व पुरवणी प्रश्न विचारण्याची परवानगी देणे.
- विधानसभा सभापतीला निर्णायक मत देण्याचा अधिकार. अर्थ विधेयक मांडण्यास परवानगी देणे.

## बडतर्फी

१. विधानपरिषदेत सभापती विरुध्द अविश्वासाचा ठराव १/२ बहुमताने मांडला जातो. त्यापूर्वी त्याला ४ दिवसाची आगाऊ नोटीस द्यावी लागते.जर हा ठराव २/३ बहुमाताने मंजूर झाला तर बडतर्फ केले जाते.
२. विधानपरिषदेचा सभापती चौकशीच्या वेळी सभागृहात उपस्थित राहू शकतो. पण मतदानात भाग घेऊ शकत नाही.
३. सभागृहात अविश्वासाचा ठराव मंजूर झाल्यानंतर सभापती बडतर्फ होतो.
४. बडतर्फ झाल्यानंतर सुध्दा त्याचे सदस्यत्व कायम राहते.

## ❖ विधानपरिषदेचे अधिकार व कार्ये :-

१. विधानसभेकडून मंजूर झालेल्या विधेयकाबाबत विधान परिषद पुढील बाबी करु शकते.
   i. त्या विधेयकामध्ये दुरुस्त्या सूचवू शकते. ii. ३ महिन्यापर्यंत संमती न देता ठेवू शकते. iii. फेटाळून लावू शकते.
२. दुसऱ्यांदा विधानसभेने विधेयक विधानपरिषद मंजूरीकरता पाठवले तर विधानपरिषद पुढील बाबी करु शकते.
   a) फेटाळून लावू शकते.
   b) विधानसभेला मान्य न होणाऱ्या दुरुस्त्या सुचवल्या.
   c) अथवा १ महिन्यापर्यंत तसेच पडून राहिले तर विधानसभेतील विधेयकाचे रुपांतर कायद्यात होते.

- **धनविधेयक :** धनविधेयक प्रथम विधानसभेत मांडतात. विधानसभेने मंजुर केलेले धनविधेयक विधानपरिषदेला १४ दिवसांच्या आत मंजूर करावे लागते. तसे न केल्यास ते विधेयक विधानपरिषदेला मान्य आहे असे समजले जाते.
- **प्रशासकीय अधिकार :**
  १. मंत्र्यांना प्रश्न, उपप्रश्न विचारू शकतो. २. विधानपरिषदेचे कामकाज तहकूब करू शकतात.
  ३. स्थगन प्रस्तावानुसार या उपायाने ते मंत्रिमंडळावर नियंत्रण ठेवू शकतात.
- **अविश्वासाचा ठरावाबाबत :** विधानसभेने मंत्रिमंडळात मांडलेला अविश्वासाचा ठराव मंजुर झाल्यास मंत्रिमंडळाला राजीनामा द्यावा लागतो. पण विधानपरिषदेतील ठरावामुळे मंत्रिमंडळाला राजीनामा द्यावा लागत नाही.
- **संयुक्त बैठकीबाबत :** विधानसभा व विधानपरिषद यांमध्ये घटनात्मक पेचप्रसंग उद्‌भवल्यास दोन्ही सभागृहाची संयुक्त बैठक घेण्याची तरतूद घटनेत नाही.

| विधानपरिषदेची आश्यकता | विधानपरिषदेची अनावश्यकता |
| --- | --- |
| १. विधानपरिषद हे स्थायी सभागृह असल्यामुळे विधान परिषदेच्या कार्यात आणि विचारात सातत्य राहते.<br>२. एखाद्या विधेयकावर विधान सभेत सखोल चर्चा होत असली तरी तेच विधेयक नंतर विधान परिषदेत विचारार्थ पाठविल्या जात असल्याने योग्य कायद्यांचीच निर्मिती होते.<br>३. विधान परिषदेत काही सदस्यांची नियुक्ती राज्यपालांकडून होत असते. ही नियुक्ती साहित्य, कला, शास्त्र इ. क्षेत्रातून होत असल्याने तज्ज्ञ व अनुभवी लोक जे राजकारणापासून अलिप्त असतात. त्यांच्या नेतृत्वगुणास वाव मिळतो.<br>४. मंत्री परिषदेच्या आणि विधानसभेच्या कार्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी विधानपरिषद ह्या वरिष्ठ गृहाची निर्मिती आवश्यक ठरते. | १. विधानपरिषदेवर काही सदस्यांची नियुक्ती राज्यपालांकडून केली जाते. त्यात काही वेळा पक्षपातीपणा आढळतो. कारण बरेचदा केंद्रातील आणि राज्यातील सत्तारुढ पक्षाच्या मर्जीनुसार ह्या नियुक्त्या केल्या जातात.<br>२. वास्तविक विधानसभा हे जनतेचे प्रतिनिधीत्व करणारे गृह असताना विधानपरिषद या दुसऱ्या गृहाची आवश्यकता नाही. विधानपरिषद हे कायदेनिर्मितीस विलंब लावणारे आणि अधिक खर्चाचे गृह मानले जाते. विधानसभेतच एका विधेयकावर तीन वाचने होऊन सविस्तर चर्चा होत असताना विधान परिषद या अनावश्यक गृहाची निर्मिती करुन खर्चाचा आणि वेळेचा अपव्यय करणे होय.<br>३. विधानसभेची सदस्यसंख्या ही विधान परिषदेपेक्षा जास्त असल्याने, काही विधेयके विधानसभेत केवळ बहुमताच्या जोरावर मंजुर केले जातात.<br>४. धनविधेयकासारखे महत्त्वाचे अधिकार विधानसभेलाच असताना महत्त्वाचे अधिकार नसणाऱ्या विधानपरिषद या वरिष्ठ गृहाची आवश्यकता भासत नाही.<br>५. अशाप्रकारे घटकराज्याच्या विधिमंडळाच्या द्विगृहाविषयी दुमत असताना शेवटी या प्रश्नावर सुवर्णमध्य काढण्यात आला आणि एखाद्या राज्यात विधान परिषद असावी किंवा नसावी हे घटकराज्याच्या विधानसभेवर अवलंबून राहील अशी तरतूद संविधानात करण्यात आली. |

## विधानसभा – विधानपरिषद सभासद संख्या :

| अ.क्र. | राज्याचे नाव | विधानसभा | विधानपरिषद |
|---|---|---|---|
| १) | आंध्रप्रदेश | २९४ | ९० |
| २) | बिहार | २४३ | ७५ |
| ३) | महाराष्ट्र | २८८ | ७८ |
| ४) | कर्नाटक | २२४ | ७५ |
| ५) | उत्तरप्रदेश | ४०३ | १०० |
| ६) | तेलंगणा | ११९ | ४० |

## विधान परिषद बरखास्ती :

| राज्य | विधानपरिषद बरखास्ती वर्ष |
|---|---|
| आंध्रप्रदेश | १९८५ |
| तामिळनाडू | १९८६ |
| पश्चिम बंगाल | १९६९ |
| पंजाब | १९६९ |

• तामिळनाडू विधानपरीषद रिअपील बिल २०१० मध्ये रद्द झाले. त्यामुळे तामिळनाडूमध्ये विधानपरिषद नाही.

## ❖ विधानसभा व विधानपरिषदेबाबत इतर महत्त्वपुर्ण माहिती :-

१. विधानसभेचे पहिले सभापती - एम. एल. पहेलवी
२. पहिले विरोधी पक्ष नेते - अली महंमद खान पेहलवी
३. विरोधी पक्षनेतेपदी निवड झालेली पहिली महिला आमदार - जे. जयललिता
४. विधानसभेची पहिली महिला सभापती - कलावती सुब्बा

# घटकराज्याचे कार्यकारी मंडळ

## राज्यपाल

| | |
|---|---|
| १५२ | व्याख्या |
| १५३ | राज्यपाल – राज्यांचे राज्यपाल |
| १५४ | राज्याची शासनशक्ती |
| १५५ | राज्यपालाची नियुक्ती |
| १५६ | राज्यपालाचा पदावधी |
| १५७ | राज्यपालपदावरील नियुक्तीसाठी अर्हता |
| १५८ | राज्यपालपदाच्या शर्ती |
| १५९ | राज्यपालाने शपथ किंवा दृढकथन करणे |
| १६० | आकस्मिक प्रसंगाची राज्यपालाची कार्ये |
| १६१ | क्षमा करण्याची, शिक्षा निलंबित /सुट/ सौम्य करण्याचा राज्यपालाचा अधिकार |
| १६२ | राज्याच्या शासनशक्तीची व्याप्ती |
| १६३ | राज्यपालास साहाय्य करण्याकरता व सल्ला देण्याकरता मंत्रीपरिषद |
| १६४ | मंत्र्यांसंबंधी अन्य उपबंध |
| १६५ | राज्याच्या महाअधिवक्ता |
| १६६ | राज्य शासनाचे कामकाज चालवणे |
| १६७ | राज्यपालास माहिती पुरविणे, इत्यादीबाबत मुख्यमंत्र्यांची कर्तव्ये |

• राज्यपाल घटकराज्याच्या कार्यकारी मंडळाचा प्रमुख असतो. कार्यकारी अधिकार राज्यपालाच्या हाती असतात. तथापि तो संसदीय पद्धतीत नाममात्र प्रमुख असतो. कलम १५३ अन्वये, प्रत्येक राज्याला एक राज्यपाल असेल, अशी तरतूद करण्यात आलेली आहे. मात्र, ७ व्या घटनादुरुस्ती कायद्यान्वये (१९५६), एकाच व्यक्तीची दोन किंवा अधिक राज्यांकरता राज्यपाल म्हणून नेमणूक करण्यास संमती प्रदान करण्यात आली.कलम १५४ अन्वये, राज्याच्या कार्यकारी अधिकार राज्यपालाच्या हाती असेल आणि त्याचा वापर राज्यपालाकडून प्रत्यक्षपणे किंवा त्याच्या हाताखालील अधिकाऱ्यांमार्फत केला जाईल.

## ❖ पात्रता (कलम १५७) :

१. वय ३५ वर्षे पूर्ण. तो राज्य विधिमंडळ अथवा संसद सदस्य नसावा. असेल तर पूर्वीच्या पदाचा राजीनामा द्यावा. नाही दिला तर राज्यपाल पद स्विकारल्यानंतर उरलेली सर्व पदे आपोआप रद्दबातल होतील.
२. भारताचा नागरीक असावा. संसदेने दिलेल्या अटी पूर्ण कराव्यात.

❖ **नेमणूक :–** राष्ट्रपतीद्वारे कलम १५४(१) नुसार राज्याच्या राज्यपालाची नेमणूक राष्ट्रपतींकडून सहीनिशी व स्वमुद्रांकित अधिपत्राद्वारे केली जाते. राज्यपाल लोकांकडून प्रत्यक्षपणे निवडूनही दिले जात नाही, तसेच राष्ट्रपतींप्रमाणे विशेष निर्वाचक गणामार्फत अप्रत्यक्षपणेही निवडून दिले जात नाही. त्यांची नेमणूक राष्ट्रपती करीत असल्याने एका अर्थाने ते केंद्र सरकारचे प्रतिनिधी म्हणून कार्य करतात. अशी पद्धत कॅनडाच्या राज्यघटनेतून घेण्यात आली आहे.

१. राज्यपाल पदाची निवडणूक होत नाही.
२. सहसा त्याच राज्यातील व्यक्तीची राज्यपाल म्हणून निवड करू नये. असा संकेत आहे, घटनेतील नियम नाही.
३. जम्मू-काश्मीर राज्यांचा राज्यपाल नेमताना ३ जणांच्या नावाची यादी दिली जाते. राष्ट्रपती त्याची नियुक्ती करतात.
४. शपथ (कलम १५९) : राज्यपालास उच्च न्यायालयाच्या मुख्यन्यायाधीशासमोर पद आणि गोपनीयतेची शपथ घ्यावी लागते.

## ❖ कार्यकाल (कलम १५६) :

१. ५ वर्षे.
२. राष्ट्रपतीची मर्जी असेपर्यंत पद धारण करतात.
३. कार्यकाल संपण्यापूर्वी राजीनामा देऊ शकतो अथवा राष्ट्रपतीद्वारे कार्यकाल वाढवला जाऊ शकतो.
४. राज्यपाल त्यांचा पदावधी संपला तरीही, त्यांच्या उत्तराधिकारी पद ग्रहण करेपर्यंत आपले पद धारण करणे चालू ठेवतात.
५. वरील तरतुदींचा अर्थ असा होतो की, राज्यपालास पदावधीची सुरक्षा नसून त्यांचा पदावधी निश्चित नाही. त्यांना राष्ट्रपती केव्हाही पदावरून दूर करू शकतात.

- राज्यपालाचे पद रिकामे झाल्यास उच्च न्यायालयाचा मुख्य न्यायाधीश पदभार सांभाळतो.

❖ **वेतन आणि भत्ते (कलम १५८) :** दरमहा ३,५०,००० वेतन राज्याच्या संचित निधीतून दिले जाते. शिवाय संसदेने कायदा करून ठरविलेले भत्ते व इतर सुविधा मिळतात. राजभवन हे राज्यपालांचे निवासस्थान असते. त्यांच्या देखभालीचा आणि तेथील सेवकवर्गाचा खर्च शासनाकडून केला जातो. (महाराष्ट्रात 'राज्यभवन') जर दोन राज्यासाठी एकच राज्यपाल असेल तर राज्यपालाचे वेतनाची विभागणी राष्ट्रपती दोन राज्यात करून देते.

## ❖ राज्यपालाचे अधिकार (कलम १५४) :

- राज्यपालाला भारताच्या राष्ट्रपतींच्या अधिकारांच्या धर्तीवर कार्यकारी, कायदेविषयक, वित्तीय आणि न्यायविषयक अधिकार आहेत. मात्र त्यांना राष्ट्रपतींप्रमाणे परराष्ट्रविषयक, लष्करी आणि आणिबाणी विषयक अधिकार प्राप्त नाहीत. राज्यपालाच्या अधिकार व कार्यांची विभागणी पुढील गटांत केली जाते :
  १. कार्यकारी अधिकार २. कायदेविषयक अधिकार ३. वित्तीय अधिकार
  ४. न्यायविषयक अधिकार ५. स्वविवेकाधिन अधिकार
- कलम २३३ नुसार राज्यपाल राज्य उच्च न्यायालयाच्या सल्ल्याने जिल्हा न्यायाधीशांच्या नेमणुका पदस्थापन व पदोन्नती करतात.

## १. कार्यकारी अधिकार (Executive Powers) :-

- मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळाची नियुक्ती.
- राज्यपालाच्या शिफारशी शिवाय कोणत्याही अनुदानाची मागणी शासनाला करता येत नाही. (कलम २०३)
- प्रत्येक आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक विधानसभेत सादर होते. मुख्यमंत्र्यांकडून विधिमंडळ कामकाजाची माहिती मागवणे.
- वेगवेगळे पदाधिकारी नेमणे, राज्यातील महाधिवक्ता, राज्यलोकसेवा आयोगाचे अध्यक्ष व सदस्य, राज्य निवडणूक आयुक्त, राज्य वित्तआयोगाचे अध्यक्ष व सदस्य, जिल्हा न्यायाधिश, विद्यापिठाचे कुलगुरु इ.
- राज्यलोकसेवा आयोगाचे अध्यक्ष व सदस्य नेमणूक राज्यपाल करतो. मात्र पदावरून दूर करण्याचा अधिकार राज्यपालास नसून तो राष्ट्रपतीस आहे.
- **नेमणुका :** i) उच्च पदस्थ, पोलिस अधिकारी, जिल्हाधिकारी यांच्या नेमणूका.
  ii) १२ नामवंत, तज्ञ व्यक्तींची नियुक्ती (विधानपरिषदेत)
- राज्यपाल हे सर्व विद्यापिठाचे कुलपती असतात.

## २. कायदेविषयक अधिकार (Legislative Powers) :

- विधीमंडळाचे अधिवेशन बोलवणे. अधिवेशनाच्या सुरुवातीला राज्यपालांचे अभिभाषण होते.
- राज्याच्या विधीमंडळाने मंजूर केलेल्या कायद्यास (विधेयक) मंजूरी देणे व काही विधेयकाची मान्यता रोखून धरणे.
- अँग्लो इंडियन समाजाचा एक प्रतिनिधी विधानसभेत नेमणे.
- राज्यपाल राज्यविधानपरिषदेत १/६ प्रतिनिधी नेमतो. वटहुकूम काढण्याचा अधिकार (कलम २१३) म्हणजेच अध्यादेश याला ६ आठवड्याच्या आत विधानसभेची परवानगी घेणे गरजेचे आहे.
- राज्यपाल छत्तीसगड, झारखंड, मध्यप्रदेश, ओडिसा या राज्यामध्ये एका आदिवासी कल्याण मंत्र्याचे नेमणूक करू शकतात.

## ३. न्यायविषयक अधिकार (Judicial Powers) :

- उच्च न्यायालयाच्या नियुक्ती बाबत राष्ट्रपतीस सल्ला देणे. कनिष्ठ न्यायालयातील न्यायाधीशांच्या नेमणुका, बदली, बढती, इ.
- आरोपींना दिलेली शिक्षा कमी करण्याचा आदेश. राज्यपाल मृत्यूदंडाची शिक्षा (फाशी) कमी करू शकत नाहीत.
- सैन्य न्यायालयाने दिलेली शिक्षा (Court Marshal) कमी करण्याचा अधिकार राज्यपालांना नाही.

## ४. आर्थिक अधिकार (Finacial Powers) :

- धनविधेयक प्रथम राज्यपालांची परवानगी घेऊन विधानसभेत मांडतात. राज्यसरकारला संचित निधीमधून रक्कम काढण्याची परवानगी देणे. धनविधेयकास पुर्वानुमती देणे (राज्यपाल धन विधेयकास मंजूरी नाकारू शकत नाही)
- अनुदानाची मागणी राज्यपालाच्या पुर्व परवानगीने घ्यावी लागते.

## ५. स्वाविवेकाधीन अधिकार (कलम १६३) (Dicreation Powers) :–

- समान बहुमत अथवा स्पष्ट बहुमत विधानसभेत एखाद्या पक्षाला नसेल तर सर्वाधिक आमदारांची संख्या पाहून त्या पक्षाच्या नेत्यास मुख्यमंत्री पदी नेमणे. घटनेनुसार राज्यकारभार चालत नसेल तर राष्ट्रपतीला या संदर्भात अहवाल सादर करतो.
- विधिमंडळाने एखादे विधेयक मंजूर केले असेल त्या विधेयकाप्रमाणे केंद्रात कायदा मंजूर झाला असल्यास असे विधेयक राष्ट्रपतीकडे मंजूरीसाठी पाठवतात.
- सामान्यत: राज्यपालांना मंत्रिमंडळाने दिलेला सल्ला बंधनकारक असतो. मात्र परिस्थिती सामान्य नसेल तेव्हा राज्यपाल स्वत: निर्णय घेतात. यालाच स्वेच्छाधिकार किंवा स्वविवेकाधिन अधिकार असे म्हणतात.
- एखादे विधेयक राज्यपाल विधिमंडळाकडे पुनर्विचारासाठी पाठवू शकतात. पण ते विधेयक परत आल्यास राज्यपालाला त्यावर सही करावीच लागते. मात्र राज्यपाल विधेयक राष्ट्रपतींकडे पाठवू शकतात. राष्ट्रपतींनी ते विधेयक नामंजूर केले तर ते पूर्णपणे रद्द होऊ शकते. ह्या प्रकारे राज्यपाल नकाराधिकाराचा वापर करू शकतात.
- राज्यपाल हे अधिकार आणीबाणीच्या वेळी वापरतात. वटहुकुम जारी करताना वापरतात.
- राज्यपाल जेव्हा स्वविवेकाधीन अधिकार वापरतात, तेव्हा त्यांनी घेतलेल्या कोणत्याही निर्णयाविरुद्ध न्यायालयात तक्रार करता येत नाही. घटकराज्यातील आणीबाणी काळात तो राज्याचा वास्तविक प्रमुख असतो.
- शेजारच्या राज्याचा अतिरिक्त कार्यभार सांभाळणे.

❖**राजीनामा** – राज्यपाल आपला राजीनामा राष्ट्रपतीकडे देतात.

❖**बडतर्फी** – राष्ट्रपती पंतप्रधान व मंत्रीमंडळाच्या सल्ल्याने बडतर्फी करतात.

❖**इतर :**

- राज्यपाल हा केंद्र व राज्य सरकार यामधील दुवा.
- डॉ. आंबेडकर यांच्या मते राज्यपालांची स्थिती ही अभूषणावत (अलंकार) झाली आहे. या पदावर खर्च करणे व्यर्थ होय.
- केंद्रशासित प्रदेशासाठी उपराज्यपाल हे पद असते. जम्मू - काश्मिरच्या विधानसभेत राज्यपाल दोन महिला सदस्य नेमू शकतात. कलम १७२ (२) प्रमाणे राज्यपाल विधानसभा बरखास्त किंवा स्थगित करतात.
- कलम ३७१ नुसार राज्यपाल विभागीय वैधानिक विकास मंडळे स्थापन करू शकतात. त्या मंडळाचा अध्यक्ष व इतर सदस्यांची नेमणूक राज्यपाल करतो. या मंडळाच्या कामकाजावर राज्यपालाचे नियंत्रण असते.

| राष्ट्रपती | राज्यपाल |
|---|---|
| • केंद्रीय कार्यकारिणी अध्यक्ष आहे.<br>• केंद्राचे सर्व निर्णय राष्ट्रपतीच्या नावाने निघतात पण वास्तवात त्याचे निर्णय पंतप्रधान घेतात.<br>• प्रत्येक निर्णय घेताना मंत्रीमंडळाचा सल्ला घेणे बंधनकारक आहे. (काही अपवाद)<br>• राष्ट्रपती मृत्यूदंडाची शिक्षा माफ करू शकतात.<br>• लोकसभेत दोन अँग्लो इंडियनांची नेमणूक करतात.<br>• यांना शपथ सरन्यायाधिश देतात.<br>• राजीनामा उपराष्ट्रपतीकडे देतात. राष्ट्रपतींची नेमणूक होत नसते.वेतन दरमहा ५,००,००० रु.<br>• महाभियोगाने बडतर्फ होतात. (कलम ६१ नुसार)<br>• संसद ज्या ज्या विषयावर कायदे करते त्यावर राष्ट्रपती हे अध्यादेश काढू शकतात.<br>• लोकसभा बरखास्त करतात. | • राज्य कार्यकारिणीचा अध्यक्ष आहे.<br>• राज्याचे सर्व आदेश राज्यपालाच्या नावे निघतात त्याचे निर्णय मुख्यमंत्री घेतात.<br>• राज्यपाल काही बाबतीत स्वविवेकाने काम पाहतो.<br>• राज्यपालांना मृत्यूदंडाची शिक्षा माफ करण्याचा अधिकार नाही.<br>• विधानसभेत एक अँग्लो इंडियनाची नेमणुक,<br>• शपथ मुख्य न्यायाधिश देतात.<br>• राजीनामा राष्ट्रपतीकडे देतात.नेमणूक राष्ट्रपती करतात. वेतन दरमहा ३,५०,००० रु.<br>• यांना राष्ट्रपती बडतर्फ करतात.<br>• राज्य विधीमंडळ ज्या विषयावर कायदे करते त्यासंबंधी राज्यपाल अध्यादेश काढू शकतात.<br>• राज्यपाल आपला अहवाल राष्ट्रपतीस देतात.<br>• विधानसभा बरखास्त करतात. |

# मुख्यमंत्री




- घटनेतील कलम १६३ नुसार राज्यपालास मदत करण्यासाठी मुख्यमंत्री व मंत्रिमंडळाची नेमणूक केली जाते. मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळाच्या हाती घटकराज्याची वास्तविक कार्यकारी सत्ता असते. मंत्रिमंडळाची रचना, अधिकाराचे स्वरूप, कार्यपद्धती ही केंद्रीय मंत्रिमंडळाप्रमाणेच असते. मंत्रिमंडळाची निवडसुद्धा त्यास पद्धतीने होते.

❖ **नेमणूक :** कलम १६४ (१) नुसार मुख्यमंत्र्यांची नियुक्ती राज्यपालाकडून केली जाईल व मुख्यमंत्र्याच्या शिफारशीवरून राज्यपाल इतर मंत्र्यांची नियुक्ती करेल. राज्यपालाचा हा अधिकार नाममात्र व औपचारिक स्वरुपाचा आहे. मुख्यमंत्र्याची निवड करण्याचा वास्तविक अधिकार राज्य विधिमंडळास बहुमतवाल्या पक्षास आहे. राज्यपालास नाही.

## ❖ विश्वासदर्शक ठराव :

- जेव्हा विधानसभेत कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत नसते तेव्हा अशा परिस्थितीत राज्यपाल सहसा विधानसभेतील सर्वात मोठ्या पक्षाच्या किंवा युतीच्या नेत्याला मुख्यमंत्री म्हणून शपथ देतात आणि त्यांना सहसा एक महिन्याच्या आत विधानसभेत विश्वासाचा ठराव (Vote of Confidence) घेण्याचे सांगितले जाते. त्यांनी हा ठराव जिंकला तर ते मुख्यमंत्री म्हणून कायम राहतात.
- अशा स्वेच्छाधिन अधिकाराचा वापर करून, तामिळनाडू (१९५१), राजस्थान (१९६७) व हरियाणा (१९८२) या राज्यांच्या राज्यपालाने सर्वात मोठ्या पक्षाच्या नेत्यास सरकार स्थापन करण्यासाठी आमंत्रित केले होते. याउलट, पंजाब (१९६७), पश्चिम बंगाल (१९७०) आणि महाराष्ट्र (१९७८) या राज्यांच्या राज्यपालाने सर्वात मोठया युतीच्या नेत्याला सरकार स्थापन करण्यासाठी आमंत्रित केले होते.
- एखाद्या व्यक्तीस मुख्यमंत्री म्हणून नियुक्त करण्यापूर्वी त्याने विधानसभेत आपले बहुमत सिद्ध करावेच, अशी तरतूद घटनेमध्ये करण्यात आलेली नाही. त्यामुळे राज्यपाल एखाद्या व्यक्तीस आधी मुख्यमंत्री नेमून त्याला ठराविक कालावधीत विधानसभेत आपले बहुमत सिद्ध करण्यासाठी सांगू शकतात. असे विविध राज्यांच्या बाबतीत करण्यात आले आहे. उदा. सध्याचे महाराष्ट्रातील फडणवीस सरकार.

## ❖ पात्रता :

- भारताचा नागरिक असावा व वयाची २५ वर्षे पुर्ण झाली असावीत. संसदेने वेळोवेळी ठरविलेल्या पात्रता त्याच्या अंगी असाव्यात. मुख्यमंत्री हा वरिष्ठ सभागृहाचा (विधानपरिषद) पण सदस्य असू शकतो उदा. मा. पृथ्वीराज चव्हाण

## ❖ कार्यकाल :

- पाच वर्षे किंवा राज्यपालाची मर्जी असेपर्यंत. मुख्यमंत्री आपला राजीनामा मुदतपूर्व देऊ शकतो.
- विधानसभेत अविश्वासाचा ठराव अथवा सरकार अल्पमतात आले तर मुख्यमंत्र्यास राजीनामा द्यावा लागतो.

❖ **मुख्यमंत्री (शपथ) :** मुख्यमंत्र्याने आपले पद ग्रहण करण्यापूर्वी राज्यपाल त्याला पद व गोपनियतेची शपथ देतात. मुख्यमंत्र्याला मात्र मुख्यमंत्री या नात्याने वेगळी कोणतीही शपथ दिली जात नाही. त्यांना राज्याचे मंत्री म्हणूनच शपथ दिली जाते. या शपथेचा नमुना तिसऱ्या अनुसूचीमध्ये देण्यात आला आहे.

❖ **वेतन व भत्ते :** राज्याचे विधिमंडळ वेळोवेळी मुख्यमंत्रीचे वेतन व भत्ते निश्चित करते, सरकारी निवासस्थान मिळते.

❖ **मुख्यमंत्र्याचे अधिकार (कलम १६७) :-** मुख्यमंत्री हा वास्तविक प्रमुख असतो. तो पक्षाच्या विधिमंडळाचा नेता असल्यामुळे त्याच्या अधिकारांना महत्त्व आहे.

i. मंत्रिमंडळाची निर्मिती ii. मंत्रिमंडळाचे खातेवाटप iii. मंत्रिमंडळ विस्तार

iv. एखाद्या मंत्र्याला जर मुख्यमंत्र्यांचे धोरण मान्य नसेल तर तो स्वत:हून राजीनामा राज्यपालाकडे देतो. अथवा मुख्यमंत्री त्याला राजीनामा देण्यास भाग पाडतो.

v. राज्याचे धोरण निश्चित करणे - मुख्यमंत्री राज्याचे धोरण ठरवून त्यास विधीमंडळाची मंजुरी घेतो.

vi. विधीमंडळात एखाद्या मंत्र्याला प्रश्नाचे उत्तर समाधानकारक देता येत नसेल तर मुख्यमंत्री त्या प्रश्नाचे उत्तर देतो.

vii. मुख्यमंत्र्याने दिलेली आश्वासने कायदेशीर समजली जातात.

viii. मुख्यमंत्री हा राज्यसरकारचा प्रवक्ता असतो.

ix. राज्यपाल व मंत्रिमंडळ यामधील दुवा.
   a) कोणताही मंत्री मुख्यमंत्र्यांच्या परवानगी शिवाय राज्यपालास भेटू शकत नाही.
   b) मुख्यमंत्री मंत्रिमंडळाचे निर्णय व प्रशासनाची माहिती राज्यपालास देतो.
   c) मंत्रिमंडळाची बैठक बोलवणे.

- मुख्यमंत्री मंत्रिमंडळाची बैठक राज्यात कुठेही बोलवू शकतो.
- महाराष्ट्रातील मंत्रिमंडळातील कॅबिनेट बैठक : काँग्रेस कालखंड - बुधवार, भाजप - मंगळवार
- राज्यपालाला मंत्रिमंडळाच्या कामकाजाबाबत दर १५ दिवसांनी माहिती पाठवण्याचे काम मुख्यमंत्री करतो.

## ❖ राजीनामा :

- मुख्यमंत्री आपला राजीनामा राज्यपालाकडे देतात. मुख्यमंत्र्यांचा राजीनामा म्हणजेच संपूर्ण मंत्रिमंडळाचा राजीनामा होय.
- मुख्यमंत्र्यांच्या मृत्यूनंतर मंत्रिमंडळ बरखास्त होते.

- **महत्वाचे :**

i. मुख्यमंत्र्याने जर आपला राजीनामा पक्षप्रमुखाकडे दिला तर तो राजीनामा म्हणजे संपुर्ण मंत्रिमंडळाचा राजीनामा नसतो. उदा. अशोक चव्हाणांनी दिलेल्या राजीनाम्यानंतर पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्री. याचाच अर्थ फक्त खांदेपालट होते, मंत्रिमंडळ बरखास्त होत नाही.

ii. **१९८० मध्ये महाराष्ट्रात प्रथम राजकीय आणीबाणी लागू झाली. तसेच ऑक्टोबर २०१४ मध्ये राजकीय आणीबाणी लागू होती.** ३१ ऑक्टोबर २०१४ पासून कार्यरत. महाराष्ट्राचे १८ वे मुख्यमंत्री. यांनी कारभार स्विकारण्याअगोदर महाराष्ट्रात आणीबाणी लागू होती. **तसेच नोव्हेंबर २०१९ ते डिसेंबर २०१९ या दरम्यान ११ दिवसाची राजकीय आणीबाणी लागू होती.** (महाराष्ट्रात फक्त **तीनदा** राजकीय आणीबाणी लागू होती.)

## ❖ दीर्घ कार्यकाळ असलेले मुख्यमंत्री :

- पवन चामलिंग (सिक्कीम) सिक्कीम डेमोक्रोटीक फ्रंट - २४ वर्षे : कार्यरत आहेत.
- ज्योती बसू (पश्चिम बंगाल) – २३ वर्षे
- वसंतराव नाईक (महाराष्ट्र) – १२ वर्षे
- शेख अब्दुल्ला (जम्मु-काश्मिर) – १२ वर्षे
- पी. रामचंद्रन (तामिळनाडू) – १० वर्षे

## ❖ मुख्यमंत्र्यांचे इतर अधिकार :-

- महाधिवक्ता, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, आयोगाच्या अध्यक्षांच्या नेमणुकीबाबत राज्यपालांना सल्ला देतात. विधानसभा भंग करणे-मुख्यमंत्री राज्यातील सरकार अविश्वास अथवा अल्पमतात आल्यास मुख्यमंत्री विधानसभा भंग करण्याचा सल्ला राज्यपालास देतो. (बंधनकारक नसलेला सल्ला)

## ❖ उपमुख्यमंत्री : उपमुख्यमंत्री हे पद घटनात्मक नाही, त्यामुळे घटनेत तरतुदी नाहीत.

# मंत्रिमंडळ

- भारताच्या घटनेमध्ये केंद्राप्रमाणेच राज्य स्तरावर सुद्धा संसदीय शासनपद्धतीची रचना करण्यात आलेली आहे. त्यानुसार राज्याच्या राजकीय – प्रशासकीय व्यवस्थेमध्ये खरी वास्तव कार्यकारी सत्ता मुख्यमंत्र्याच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळाच्या हातात आहे.
- भारतातील संसदीय शासनव्यवस्थेच्या तत्वांचे वर्णन मात्र घटनेत करण्यात आलेले नाही. केवळ कलम १६३ व १६४ या दोन कलमांमध्ये राज्यस्तरीय शासनव्यवस्थेबद्दल काही तरतूदी ढोबळ मानाने देण्यात आलेल्या आहेत.
- त्यांपैकी कलम १६३ मध्ये मंत्रिमंडळाच्या दर्जाची तरतूद आहे, तर कलम १६४ मध्ये मंत्र्यांची नियुक्ती, पदावधी, जबाबदारी, पात्रता, शपथ आणि पगार व भत्ते यांबाबतच्या तरतुदी आहेत.
- घटनेतील कलम १६३ नुसार राज्यपालास मदत करण्यासाठी एक मंत्रिमंडळ असेल अशी तरतूद करण्यात आली.
- निवड : मुख्यमंत्री
- नेमणुक : राज्यपाल करतात.
- कार्यकाल : ५ वर्षे
- शपथ व राजीनामा : राज्यपाल
- बडतर्फी : मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्याने राज्यपालाकडून.
- मंत्रिमंडळाची बैठक दर आठवड्यातून एकदा राज्यात होते.(महाराष्ट्रात मंगळवारी)

## ❖ मंत्र्याचे प्रकार :-

- घटनेमध्ये राज्याच्या मंत्रिमंडळाचा आकार तसेच मंत्र्यांचे प्रकार यांबाबत कोणत्याही तरतुदी करण्यात आलेल्या नाहीत. त्याबाबतचा निर्णय मुख्यमंत्री तत्कालीन परिस्थितीच्या गरजेनुसार घेतला जातो. केंद्रीय मंत्रिमंडळाप्रमाणेच राज्य मंत्रिमंडळामध्ये मुख्यमंत्री व मंत्री यांचा समावेश होतो. मंत्रीमंडळात तीन प्रकारचे मंत्री असतात.
  १. कॅबिनेट मंत्री २. राज्यमंत्री ३. उपमंत्री
- वरील तीन प्रकारच्या मंत्र्यांमध्ये दर्जा, वित्तलब्धी व राजकीय महत्व यांनुसार फरक असतो. या सर्व मंत्र्यांच्या सर्वोच्च स्थानी मुख्यमंत्री असतात, जे राज्याचे सर्वोच्च कार्यकारी प्राधिकारी असतात.

### १. कॅबिनेट मंत्री :

- प्रथम श्रेणीचे मंत्री, स्वतंत्र खाते कारभार, राज्याचे धोरण ठरवताना मुख्यमंत्र्यासोबत महत्त्वाची भूमिका. कॅबिनेट मंत्री हे सहसा पक्षाचे / युतीचे ज्येष्ठ सदस्य असतात. त्यांना राज्य शासनाच्या महत्वाच्या विभागांचे / खात्यांचे मंत्री बनविण्यात येते.
- उदा. गृह खाते, वित्त खाते, कृषि खाते इत्यादी. कॅबिनेट मंत्र्यांच्या गटास 'कॅबिनेट' असे म्हणतात. कॅबिनेटच्या सभांना ते हजर राहतात व त्याच्या निर्णय प्रक्रियेमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात.

### २. राज्यमंत्री :

- मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी असतात. राज्यमंत्र्यांना विभागाचा स्वतंत्र कार्यभार दिला जाऊ शकतो. किंवा कॅबिनेट मंत्र्याला सहाय्यक म्हणून नेमले जाते.
- राज्यमंत्री कॅबिनेट मंत्र्याच्या पर्यवेक्षण व दिशादर्शनाखाली कार्य करतात. त्यांना स्वतंत्र कार्यभार दिलेला असल्यास ते कॅबिनेट मंत्र्यांप्रमाणेच कार्ये व अधिकार पार पाडतात.
- मात्र ते कॅबिनेटचे सदस्य नसल्याने कॅबिनेटच्या सभांना हजर राहत नाही. अर्थात, त्यांच्या विभागासंबंधी बाबींवर चर्चा करतेवेळी त्यांना कॅबिनेट सभांमध्ये विशेष आमंत्रित केले जाऊ शकते.

### ३. उपमंत्री –

- अनेक खात्यांचा कारभार एखाद्या मंत्र्याला जास्त दिला गेला असेल तर त्याच्या सहाय्याला उपमंत्री नेमतात. उपमंत्र्यांना विभागाचा स्वतंत्र कार्यभार दिला जात नाही.
- ते कॅबिनेट मंत्र्याला सहाय्यक म्हणून कार्य करतात तसेच त्यांना त्यांच्या प्रशासकीय, राजकीय तसेच विधानमंडळातील कामकाजात मदत करतात. ते कॅबिनेटचे सदस्य नसतात, त्यामुळे कॅबिनेटच्या सभांमध्ये भाग घेत नाही.

## ❖ मंत्रिमंडळाची कार्ये :

- अलीकडील काळात मुख्यमंत्री व त्यांच्या मंत्रिमंडळाने निरनिराळ्या समित्या तयार केल्या आहेत. उदा. उद्योग समिती, अर्थसमिती इत्यादी समित्यामध्ये चार मंत्री असतात.
- मुख्यमंत्री किंवा ज्येष्ठ मंत्री या समितीच्या अध्यक्ष असतो. या समितीला प्रत्येक विधेयकावर सर्वांगीण विचार करून आपल्या कार्याचा अहवाल मंत्रिमंडळासमोर सादर करावा लागतो.
- यामुळे मंत्रिमंडळाचा वेळ वाचतो. म्हणून पूर्ण अभ्यास करुन त्वरीत निर्णय घेणे मंत्रिमंडळाला शक्य नाही. असे कार्य करीत साधारणत: मंत्रिमंडळाला पुढील जबाबदारी पार पाडावी लागते.

| विधीविषयक कार्ये | शासनविषयक अधिकार | अर्थविषयक काये | इतर कार्ये |
|---|---|---|---|
| मंत्रिमंडळ राज्याचे धोरण ठरविते व त्याची अंमलबजावणी करते. या धोरणाची अंमलबजावणी करतांना मंत्रिमंडळाला काही नवीन कायदे निर्मिती करावी लागते. कारण काही धोरण एकदम नवे असतात अशा स्वरुपाचा कायदा अगोदर नसतो. | मंत्रिमंडळ ही राज्याची वास्तविक कार्यकारिणी आहे. त्यामुळे राज्यातील सर्व शासनविषयक अधिकार मंत्रिमंडळाला असतात. आपल्या पहिल्या बैठकीत शासनविषयक धोरण ठरविले जाते व पुढील अधिवेशनापर्यंत त्या धोरणांची अंमलबजावणी करावी लागते. हे शासनविषयक धोरण ठरवितांना पक्षाने निवडणुकीच्या वेळी जी आश्वासने दिली होती. | सामान्य व्यक्तीच्या राहणीमानाचा दर्जा वाढविणे, राज्याचा औद्योगिक विकास घडवून आणणे इत्यादी कार्य मंत्रिमंडळाला करावी लागतात. त्यामुळे मंत्रीमंडळाला व्यापक अर्थविषयक अधिकार देण्यात आले आहे. | मंत्रिमंडळाला वरील कार्याशिवाय इतरही महत्वाची कार्ये करावी लागतात. यामध्ये प्रामुख्याने राज्यामध्ये शांतता सुव्यवस्था निर्माण करणे. |

| विधीविषयक कार्ये | शासनविषयक अधिकार | अर्थविषयक कार्ये | इतर कार्ये |
|---|---|---|---|
| त्यामुळे जर ते धोरण अंमलात आणायचे असेल तर मंत्रिमंडळाला नविन कायद्याची निर्मिती करावी लागते. विधिमंडळ पद्धतीत मांडण्यात येणाऱ्या विधेयकापैकी ९९.९९ टक्के सरकारी विधेयके असतात व ती शासनाच्या निरनिराळ्या खात्याकडून तयार करण्यात येतात. त्याचप्रमाणे धनविधेयक किंवा सामान्य विधेयक मंत्रिमंडळच विधिमंडळामध्ये सादर करते. | त्यांचा विचार करण्यात येतो व असे धोरण आखण्यात येते की जेणेकरुन त्या धोरणाची अंमलबजावणी करतांना त्या आश्वासनाची पूर्तता होईल. याशिवाय सेवा वर्गातील अधिकाऱ्यांच्या नेमणुका करणे, शांतता व सुरक्षितता या संबंधी उपाय करणे अशा विविध स्वरुपाचे निर्णय मंत्रिमंडळाला द्यावे लागतात. तसेच नुसते निर्णय घेऊन त्यांचे काम संपत नाही तर ते निर्णय कार्यान्वित करावे लागतात. | म्हणून मंत्री मंडळाला राज्याचे अंदाजपत्रक तयार करुन विधिमंडळात मांडावे लागते. विधिमंडळाने ते अंदाजपत्रक मान्य केल्यास त्याची अंमलबजावणी मंत्रिमंडळालाच करावी लागते. राज्याचे आर्थिक धोरण मंत्रीमंडळ ठरवते तसेच आकस्मिक खर्चाला मान्यता देणे, नवे कर आकारणे, ते रद्द करणे व आर्थिक प्रशासनाचे नियंत्रण करणे इत्यादी कार्ये मंत्रिमंडळाला पार पाडावी लागतात. | राज्यामध्ये औद्योगिक क्षेत्राचा, कृषी विकास कशा प्रकारे होईल याची काळजी घेणे सर्व सामान्य जनतेच्या हिताची काळजी घेवून अन्याय अत्याचाराला वाचा फोडणे, राज्याच्या आर्थिक, सांस्कृतिक इ. क्षेत्राची प्रगती घडून आणणे. |

## ❖ राज्याचा मुख्य सचिव :

- राज्य शासनाचा प्रशासकीय प्रमुख हा मुख्य सचिव असतो.महाराष्ट्राचे मंत्रालय (सचिवालय) त्याच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली असते.राज्यातील आय. ए. एस. अधिकाऱ्यांपैकी ज्येष्ठ अधिकाऱ्याची मुख्य सचिवपदी नेमणूक करण्यात येते.
- ज्याप्रमाणे मुख्यमंत्री बहुमत असलेल्या पक्षाचे नेतृत्व करतो त्याप्रमाणे मुख्य सचिव राज्यकारभारांच्या कर्मचाऱ्यांचा व अधिकाऱ्यांचा नेता असतो. सनदी नोकर आपल्यावर होणाऱ्या अन्यायाची दाद मुख्य सचिवाकडे मागतात.

## ❖ कार्ये : -

- मुख्यमंत्रिमंडळाच्या ज्या समित्या असतात त्यांचाही म्हणून तो कार्य करतो. मंत्रिमंडळाच्या बैठकीची कार्यक्रमपत्रिका मुख्यमंत्र्याच्या मार्गदर्शनाखाली तो तयार करतो.
- कॅबिनेटच्या बैठकीत जे ठराव मांडायचे असतात त्यांची बहुतेक वेळा मुख्य सचिवाकडून आधी छाननी होते असते. तसेच मंत्रिमंडळाच्या बैठकीचे इतिवृत्त तो तयार करतो व त्याचे दफ्तर ठेवतो.
- सचिव मुख्यमंत्र्याचा मुख्य सल्लागार असतो. मुख्य सचिव मंत्रिमंडळाचा सचिव असतो.
- राज्यातील सनदी सेवकांचा प्रमुख असल्याने राज्य सरकारच्या कर्मचाऱ्यांच्या नेमणूका, बढती, बदली, शिस्तभंगाची कारवाई इ. संबंधीचे निर्णय मुख्य सचिवाच्या सल्ल्यानुसार घेतले जातात.
- राज्यसरकारची गोपनीय कागदपत्रे त्याच्या ताब्यात असतात. राज्यशासनाच्या विविध प्रकारच्या प्रशासकीय समित्यांचा तो अध्यक्ष असतो. कॅबिनेटच्या बैठकीत तो हजर राहतो तसेच मंत्रिमंडळाच्या समित्यांच्या बैठकीला तो हजर राहू शकतो.
- अशा बैठकीत विशिष्ट प्रश्नाबाबत काही स्पष्टीकरण विचारल्यास तो देतो.
- केंद्रशासन आणि इतर राज्ये यांच्याशी संपर्काचे माध्यम : राज्याचा केंद्र सरकारशी तसेच इतर राज्यांशी जो संपर्क असतो त्यात मुख्य सचिव महत्त्वाची भूमिका बजावत असतो. दरवर्षी सर्व राज्यांच्या मुख्य सचिवाची बैठक दिल्ली येथे भरते. त्यात मुख्य सचिव आपल्या राज्याचे प्रतिनिधीत्व करतो. राष्ट्रीय विकास मंडळ, विभागीय मंडळ यात मुख्य सचिव राज्याचे प्रतिनिधीत्व करतो.
- आपत्ती व्यवस्थापन : पूर, दुष्काळ व भूकंप अशा नैसर्गिक आपत्तींच्या काळात लोकांना तातडीने मदत- कार्य पुरविण्याचे कार्य विविध प्रशासकीय यंत्रणांना करावे लागते. त्याचे नियंत्रण आणि मार्गदर्शन करण्याची जबाबदारी मुख्य सचिवाची असते.

## ❖ सदस्यांचे सदस्यत्व नष्ट होणे : (कलम १९० ते कलम १९२)

- ऐकावेळी एकाच राज्याच्या विधिमंडळाचे सदस्य होता येते. तसेच एकाचवेळी राज्यविधिमंडळाच्या दोन्ही सदनाचे सभासद होता येत नाही. राज्यविधिमंडळाच्या कायदा करून सदस्याचे सदस्यत्व रद्द करते.
- सलग दोन महिने परवानगीशीवाय गैरहजर राहिल्यास सदस्यत्व रद्द होते. निवडणूकीच्या खर्चाचा हिशोब न दिल्यास सदस्यत्व रद्द होते. जर एखादा सदस्य पगार पदावर असेल तर त्याचे सदस्यत्व रद्द होते.
- सभासदांचे अधिकार विशेष अधिकार घटनेच्या कक्षेत राहून ठरविण्याचा अधिकार राज्य विधिमंडळाला आहे.
- राज्यातील आमदारांचे वेतन, भत्ते, सूखसोयी ठरविण्याचा अधिकार राज्यविधिमंडळाला आहे.

## ❖ राज्य विधीमंडळाची अधिकार व कार्ये :-

- समवर्ती सूची व राज्य सूची यातील कोणत्याही विषयासंबंधी कायदे कारण्याचा अधिकार राज्य विधीमंडळास आहे.
- राष्ट्रपतीच्या निवडणूकीत केवळ विधानसभेतील निर्वाचित सभासद मतदार असतात. तसेच राज्यसभेच्या महाराष्ट्रातील सभासदांची व विधानपरिषदेच्या १/३ सभासदांची निवड विधानसभेचे सदस्य करतात.
- विशिष्ट प्रकारच्या घटना दुरुस्तीकरिता निम्म्याहून अधिक घटक राज्यांच्या विधिमंडळाची मान्यता आवश्यक असते.

## ❖ राज्य विधिमंडळात कायदा करण्याची प्रक्रिया :

- संसदेत विधेयकाचे कायद्यात रुपांतर करण्याची प्रक्रिया पाहताना जो तक्ता आपण पाहिला होता तोच तक्ता आपण घटक राज्यातील कायदा करण्याच्या प्रक्रियेसाठी देखील वापरु शकतो. मात्र राज्य विधिमंडळात संयुक्त बैठक ही तरतूद नसते.
- विधानपरिषद विधेयकाचा पुनर्विचार करण्यास विधानसभेला सुचवू शकते, मात्र अंतिम अधिकार विधानसभेचा असतो.
- अर्थ विधेयकाबाबतीत संसदेत व घटकराज्यात लागू होणाऱ्या तरतूदी सारख्या आहेत.
- घटनादुरुस्तीच्या फक्त एका पद्धतीमध्ये घटकराज्याच्या विधानसभेचा समावेश असतो.
- विधेयकाचे कायद्यात रुपांतर होण्याचा शेवटचा टप्पा म्हणजे राज्यपालांची स्वाक्षरी. विधेयक स्वाक्षरीसाठी आल्यास –
  a) राज्यपाल सही करतात व विधेयकाचे कायद्यात रुपांतर होते.
  b) विधिमंडळाकडे पुनर्विचारासाठी पाठवलेले विधेयक मंजूर होऊन पुन्हा राज्यपालाकडे आल्यास, राज्यपालांना त्यावर सही करावीच लागते.
  c) राज्यपाल विधेयक राष्ट्रपतीकडे पाठवतात.

| क्र. | समित्या व स्थापना | सदस्य संख्या | कार्यकाल | कार्य |
|---|---|---|---|---|
| १) | सार्वजनिक हिशेब समिती/ लोकलेखा समिती स्थापना : सन १९२३ | सन १९८१ पासून महाराष्ट्राच्या लो.स. ने सदस्य संख्या २५ केली.<br>विधानसभेतून : २०<br>विधानपरिषदेतून : ५ | १ वर्ष | भारताच्या महालेखापालाने तयार केलेले राज्य सरकारच्या खर्चाच्या हिशेबाचे अहवाल व त्यावरील ऑडिट रिपोर्टची तपासणी करणे. त्यानुसार ही समिती सरकारवर टीका करू शकते. |
| २) | अनुमान किंवा अंदाजपत्रकीय समिती | सदस्य संख्या : २९<br>विधानसभेतून : २३<br>विधानपरिषदेतून : ०६ | १ वर्ष | प्रत्येक शासकीय खात्यासाठी जो अंदाजी खर्च दरवर्षी धरण्यात येतो त्या यथायोग्यतेची तपशील- वार छाननी करणे, शासकीय कारभारात काटकसर व कार्य- क्षमता आणण्यासाठी उपाययोजना सुचविणे. |
| ३) | सार्वजनिक उपक्रम समिती स्थापना – सन १९४७ | सदस्य संख्या : २५<br>विधानसभेतून : २०<br>विधानपरिषदेतून : ०५ | १ वर्ष | सार्वजनिक उपक्रमांच्या आर्थिक कारभाराची आणि व्यवहारांची तपासणी करून त्यांच्यावर आर्थिक नियंत्रण ठेवणे. |
| ४) | पंचायतराज्य समिती स्थापना : ६ सप्टेंबर १९७३ | सदस्य संख्या : २५<br>विधानसभेतून : २०<br>विधानपरिषदेतून : ०५ | १ वर्ष | जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांचे अर्थसंकल्प व लेखे या संबंधातील वार्षिक अहवाल व लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवाल यांची तपासणी करणे. |
| ५) | उपविधान समिती स्थापना : सन १९७३ | सदस्य संख्या : १९<br>विधानसभेतून : १५<br>विधानपरिषदेतून : ०४ | १ वर्ष | राज्यपाल किंवा राष्ट्रपतींनी मंजूर केलेल्या कायद्यातील तरतुदीं प्रमाणे कायद्यांच्या अंमलबजावणी- साठी आवश्यक त्या बाबींसंबंधात नियम, विनिमय किंवा उपविधी तयार करणे. |
| ६) | अनुसूचित जाती कल्याण समिती, अनुसूचित जमाती कल्याण समिती, भटक्या जमाती कल्याण समिती | सदस्य संख्या : २२<br>विधानसभेतून : १५<br>विधानपरिषदेतून : ०७ | १ वर्ष | सार्वजनिक उपक्रमात अनुसूचित जाती - जमाती, विमुक्त भटक्या जाती - जमाती यांना योग्य प्रतिनिधित्व दिले आहे किंवा नाही याची पाहणी करून त्यांना प्रतिनिधित्व देण्यासंबंधी शिफारशी करणे व तो अहवाल विधानसभेला सादर करणे. |

| क्र. | समित्या व स्थापना | सदस्य संख्या | कार्यकाल | कार्य |
|---|---|---|---|---|
| ७) | रोजगार हमी योजना समिती<br>स्थापना : सन १९७५ | सदस्य संख्या : २५<br>विधानसभेतून : २०<br>विधानपरिषदेतून : ५ | १ वर्ष | योजनेच्या कार्यवाहीची सर्वांगीण तपासणी करणे,कार्याचे मूल्यमापन करणे व यशस्वीतेसाठी परिणाम- कारक उपाययोजना सुचविणे. |
| ८) | आश्वासन समिती | सदस्य संख्या : १९ | १ वर्ष | सभागृहात दिलेल्या आश्वासना- प्रमाणे जरुर ती कृती केली जाण्यासाठी संबंधित खात्याचा सतत पाठपुरावा करणे. |
| ९) | विनंती अर्ज समिती | सदस्य संख्या : ११ | १ वर्ष | विधानसभा विनंती-अर्ज |

# महाधिवक्ता (कलम १६५)

| | |
|---|---|
| **१६५** | राज्याच्या महाअधिवक्ता |
| **१६६** | राज्य शासनाचे कामकाज चालवणे |
| **१६७** | राज्यपालास माहिती पुरविणे, इत्यादींबाबत मुख्यमंत्र्यांची कर्तव्ये |

- केंद्र सरकारला कायदेविषयक बाबतीत सल्ला देण्यासाठी जसा महान्यायवादी असतो तसा राज्य सरकारला कायदेविषयक सल्ला देण्यासाठी महाधिवक्ता असतो.
- मुख्यमंत्री व मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार राज्यपाल महाधिवक्याची नेमणूक करतात.
- **पात्रता :** उच्च न्यायालयातील न्यायाधीशांसाठी आवश्यक असणारी पात्रता त्या व्यक्तीकडे असावी लागते. तो भारताचा नागरीक असावा. त्याचे वय ६५ वर्षांपेक्षा अधिक नसावे. जिल्हा न्यायालयात कमीत-कमी १० वर्षे न्यायाधीश पदाचा अनुभव असावा. उच्च न्यायालयातील १० वर्षे वकिलीची अनुभव असावा. तो कायदेपंडित असावा.
- कायद्याचे ज्ञान असलेल्या व प्रशासनाचा दीर्घ अनुभव असलेल्या व्यक्तीचीच या पदावर नियुक्ती केली जाते.

## ❖ राज्यसरकारचे सर्वोच्च कायदा अधिकारी या नात्याने महाधिवक्त्याची कार्ये :-

- राज्यपालांना कायदेविषयक सल्ला देणे.राज्य सरकारच्या वतीने राज्याचे खटले न्यायालयात लढवणे, इतर न्यायालयात व सर्वोच्च न्यायालयात राज्य सरकारची बाजू मांडणे.
- राज्याच्या कायदेमंडळात उपस्थित राहून कायदेविषयक मत / सल्ला देता येतो.
- महाधिवक्ता राज्य विधिमंडळात भाषण करू शकतो. चर्चेत भाग घेऊ शकतो पण मतदान करु शकत नाही. त्यांना राज्याच्या क्षेत्रातील सर्व न्यायालयांमध्ये सुनावणी ऐकून घेतले जाण्याचा अधिकार आहे.
- राज्यपालास अभिभाषणास बोलावणे. महाधिवक्ता हे राज्यसरकारचे पुर्णकालीन वकील नाहीत. ते सरकारी सेवक या गटात मोडत नाहीत. तसेच त्यांना खाजगी वकीली करण्यापासून (रोखले जाणार नाही) प्रतिबाधित करण्यात आलेले नाही.

## ➢ मुंबईचे शेरीफ :-

- मुंबई शेरीफ हे अराजकीय अधिकारपद असून ते एक वर्षाच्या कालावधीसाठी मुंबईच्या एखाद्या प्रख्यात नागरीकास बहाल केले जाते. सध्या सतिश चित्त गोफेकर या मुंबईचे शेरीफ आहेत. शेरीफ हा उच्च न्यायालयाचा अधिकारी असतो आणि उच्च न्यायालयाची समन्स बजावणे तसेच मालमत्ता जप्त व सील करणे आणि आवश्यकतेनुसार तिचा लिलाव करणे यासंबंधी विभागाचा तो नामधारी प्रमुख असतो. शेरीफला स्वत:चे कार्यालय व कर्मचारीवर्ग असतो. परंतु त्याला कार्यकारी अधिकार नसतात. शेरीफचे कार्यालय उच्च न्यायालयाच्या इमारतीत असते. शेरीफचा मान महापौरांच्या खालोखाल असतो. भारतात केवळ मुंबई, चेन्नई आणि कोलकत्ता येथे अद्यापही हे पद आहे.

## ❖ शेरीफची महत्त्वाची कार्ये :

- शहराच्या वतीने परदेशी सन्माननीय अतिर्थींचे विमानतळावर स्वागत करणे.
- शहरातील मान्यवरांच्या मृत्यूनंतर शोकसभा आयोजित करणे.
- श्री. महादेव लक्ष्मण डहाणुकर हे मुंबईचे पहिले शेरीफ (१९४८) होते.
- शेरीफ अनेक समारंभाचे, परिषदांचे अध्यक्षपद भूषवितात. या पदावरील व्यक्तीला मुख्यमंत्री व शहराचे महानगरपालिका आयुक्त यांच्याशी जवळून संबंध ठेवता येतो. प्रत्येक वर्षी डिसेंबर महिन्यात ही नेमणूक केली जाते.

★★★★★★★★★★★★★★★★★★★★